# मंत्री कसे असावे नसावे

(शाहीर:- कविभूषणसुत प्रभाकर जामखेडकर, मुंबई.)

ऐका मित्रांनो, रसिकजनांनो, नामदार मंत्री कसे असावे।
सभेत बसला, पोवाडा ऐकता घोरत बसणार नसावे ॥ धृ ॥
सफेद टोपी, ढेरी मोठी अन् अवतार 'बापूचे' असावे।
सफेद बगळे (खादीचे डगले), अंतरी काळे पण भोळे भाबडे नसावे॥१॥
मतांची झोळी घेऊन जाताना शेळी बनणारे असावे।
गरज सरल्यावर मतदार मेला तरी पर्वा करणार नसावे॥२॥
सात पिढ्यांसाठी इस्टेट जमविणार "सच्चे समाजवादी" असावे।
नातेवाईकांना नोकऱ्या देऊनही लाचलुचपती नसावे॥३॥
सहकाराचे कारखाने काढून 'स्वाहाकार' करणार असावे।
कारस्थाने नाना करूनही हाहाःकार करणार नसावे॥४॥
स्वतःला मलिदा, जनतेला धत्तुरा, पुरवठा करणार असावे।
सणाला (दिवाळीला) साखर, गरिबाला भाकर, जनतेचे चाकर नसावे॥५॥
बाईपुढती नांगी टाकणारे (शेपूट घालणारे) 'शूर शिवाजी' असावे।
टोपी फिरवुनी खुर्ची सोडणारे "रणछोडदास" ते नसावे ॥६॥
सर्वज्ञानी, विशालकर्णी (करणी), गणपतीबाप्पा असावे।
ऐदीनंदन, कपाळी चंदन अन् गुळाचा गणपती नसावे॥७॥
टॅक्स भरण्याचं पुरतं विसरणारे, प्रोफेसर ते असावे।
उपदेशाचे डोस पाजण्यास मात्र कधीच विसरणार नसावे॥८॥
मॅटर्निटी ते व्हेटर्निटीचे उद्घाटनवीर असावे।
खात्याच्या कामी वेळ देणारे, नोकरशहा कधी नसावे॥९॥
लोका सांगे ब्रह्मज्ञान परि स्वतः कोरडे असावे।
दिलेली आश्वासने पाळणारे 'हरिश्चंद्र' ते नसावे ॥१०॥
जातीयतेवर निवडणूक लढवणार पक्के 'सेक्यूलर' (निधर्मी) असावे।
दलितांबद्दल वरवर कैवार मात्र 'उद्धार' करणार नसावे॥११॥

गरिबांना हटवून 'गरिबी हटवणारे' गर्भश्रीमंत असावे।
निवडणूक फंडासाठी पुंजीपतींचे धन अव्हेरणार नसावे ॥ १२॥
गरिबांना फटका देणारा मटका खपवून घेणार असावे।
स्मगलिंगशी लिंक ठेवून कलंकित कधीच होणार नसावे ॥ १३॥
योजना आखुनही बढ्याबोल करणारे योजनाबहाद्दूर असावे।
वाढत्या महागाईला आळा घालणारे कृतीवीर ते नसावे ॥ १४॥
महागाई मोर्चा (लाटणे मोर्चा) आला असताना 'चर्चा' टाळणार असावे।
घेरावला घाबरून पळ काढणारे 'भागुबाई' ते नसावे ॥ १५॥
परदेशवारीला नित्य जाणारे वारकरी पंथी असावे।
स्वदेशपूजक सर्वोदयवादी, गबाळग्रंथी नसावे ॥ १६॥
प्रभाकराचे शब्द ऐकता भडकून जाणार असावे।
महागाईवाणी भडकले तरीही 'ताळ' सोडणारे नसावे ॥ १७॥

— × • × —

मुंबई,
१४-१-१९७४.

Kinaskar